# प्रेस नोट

दिनांक ११/०९/२०२५

सहा. संचालक वर्ग १, सहा. लेखाधिकारी, वर्ग ३, शिपाई वर्ग ४ स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय रत्नागिरी व वित्त विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी ता.जि. रत्नागिरी यांना लाच रक्कम स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी विभागाने घेतले ताब्यात

| | |
|---|---|
| अेसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री शरद रघुनाथ जाधव वय ५३ वर्षे , पद- सहाय्यक संचालक, वर्ग-१, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय रत्नागिरी.<br>२) श्री सिध्दार्थ विजय शेटये वय ४५ वर्षे, पद- सहा. लेखाधिकारी, वर्ग-३, वित्त विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी,<br>३)श्री. सतेज शांताराम घवाळी वय ३८ वर्ष, पद- शिपाई (कंत्राटी) वर्ग-४ स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय, रत्नागिरी |
| तक्रार अर्जातील मागणी केलेली लाचेची रक्कम | २४,०००/- रुपये |
| तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | १६,५००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १६,५००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे पंचायत समिती दापोली येथे सहा. लेखाधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. सहा. संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण, कार्यालय, रत्नागिरी यांचेमार्फत पंचायत समिती दापोली कार्यालयाचे लेखा परिक्षण करण्यात येते. त्यानुसार सन २०२० ते २०२१ व २०२१ ते २०२२ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालामधील प्रलंबित असलेल्या २१ मुद्दयांची पुर्तता करुन तसा अनुपालन अहवाल दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सहा. संचालक , स्थानिक निधी, लेखा परिक्षण कार्यालय रत्नागिरी यांना सादर केला होता.<br>दिनांक ०५/०८/२०२५ रोजी स्थानिक निधी, लेखा परिक्षण, कार्यालय रत्नागिरी याठिकाणी कंत्राटी कर्मचारी घवाळी यांची तक्रारदार यांनी भेट घेतली असता, अनुपालन अहवालानुसार पुर्तता केलेले २१ मुद्दे वगळुन त्याप्रमाणे परिच्छेद वगळलेबाबतचा अतिंम अहवाल (एफआर) देण्याकरीता सहा.संचालक श्री.जाधव यांचेकरीता घवाळी यांनी तक्रारदार यांचेकडे २४०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याची तक्रार अँन्टी करप्शन ब्युरो रत्नागिरी येथे दिनांक ११/०९/२०२५ रोजी दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ११/०९/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लेखा परिक्षण अहवालामधील प्रलंबित असलेल्या २१ मुद्दयांपैकी १५ मुद्दे वगळुन तसा अहवाल देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे कंत्राटी कर्मचारी सतेज घवाळी यांनी लोकसेवक सहा.संचालय, शरद जाधव यांचेवतीने १६,५००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. |

| | |
|---|---|
| | पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार लेखापरिक्षण अहवालामधील प्रलबिंत असलेल्या २१ मुद्यापैकी १५ मुद्दे वगळुन तसा अहवाल देण्याकरीता तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेल्याप्रमाणे १६,५००/- रुपये लाच रक्कम सहा.संचालक शरद जाधव यांचे संमत्तीने कंत्राटी कर्मचारी सतेज घवाळी, शिपाई यांनी स्विकारुन ती लाच रक्कम सिध्दार्थ विजय शेटये ,सहा. लेखाधिकारी यांचेकडे दिल्यानतंर लोकसेवक १) श्री शरद रघुनाथ जाधव, सहा.संचालक वर्ग-१, स्थानिक निधी लेखा परिक्षण कार्यालय,रत्नागिरी ,२)सिध्दार्थ विजय शेटये सहा.लेखाधिकारी, वित्त विभाग जिल्हा परिषद, रत्नागिरी व ३)सतेज शांताराम घवाळी , पद शिपाई (कंत्राटी) स्थानिक निधी लेखा परीक्षण कार्यालय रत्नागिरी यांना दिनांक ११/०९/२०२५ रोजी १९.४६ वा. स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालयामध्ये पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई मा. पोलीस अधीक्षक, श्री. शिवराज पाटील, अपर पोलीस अधीक्षक श्री. भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक श्री सुहास शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक अविनाश पाटील यांचे पर्यवेक्षणखाली पोलीस निरीक्षक सुहास रोकडे, पोलीस निरीक्षक मच्छिंद्र जाधव, सपोफौ चांदणे, पोहवा वाघाटे, पोहवा नलावडे, पोहवा आंबेकर, पोहवा विचारे, पोकॉ पवार, पोकॉ गावकर, पोकॉ धनवडे व पोकॉ क्षिरसागर यांनी केली आहे |

ॲन्टी करप्शन ब्युरो रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

पोलीस उपअधीक्षक श्री. अविनाश पाटील :- ७५८८९४१२४७

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893, 7588941247
Office email :-dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharashtra.gov.in
Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook page :- www.facebook.com/MaharashtraACB

( अविनाश पाटील )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते
RATNAGIRI